Annexure XIX(2)
(Vide Article-19.06.03)

जंगल कामगार सहकारी संस्थांना कूपतोडीची
कामे देण्याच्या पध्दती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. एफएलटी १०९२/प्र.क्र. ९९/फ-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :-२० नोव्हेंबर, १९९३

वाचा:-
१. कृषि व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलटी १०५८/१११११२३/ई [दोन], दिनांक ३ डिसेंबर, १९५९.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलटी १०६७/२०७२५/एफ-३ दिनांक २६.१२.१९८०
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलटी १४६९/८२४८/वाय दिनांक २९.३.१९७१.
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलटी १०८७/प्र.क्र.४९१/फ-९, दिनांक २० मार्च, १९८७.
५. महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. एफएलटी १०८७/प्र.क्र.४९१/फ-९ दिनांक २ एप्रिल, १९८७.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्यात वनक्षेत्रामध्ये कार्य आयोजनेप्रमाणे काम करीत असताना जे कूपस तोडण्यासाठी घेतले जातात त्यामधील बरेचसे कूप जंगल कामगार सहकारी संस्थांना दिले जातात. या संस्थांना कूप तोडीची कामे देण्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा करण्यासाठी शासन निर्णय क्र. एफएलटी १०८७/ प्र.क्र. ४९१/फ-९, दिनांक २० मार्च १९८७ आणि शासन शुध्दिपत्रक क्र. एफएलटी १०८७/प्र.क्र.४९१/फ-९, दिनांक २ एप्रिल १९८७ अन्वये सहकारी संस्थांना फक्त लॉगिंग सूत्र पध्दतीप्रमाणे कूप तोडीची कामे देण्याची पध्दती निश्चित करण्यात आली होती. सदर आदेशास जंगल कामगार सहकारी संस्थांनी विरोध दर्शवून आधीच्याच पध्दतीप्रमाणे कूप तोडीची कामे देण्यात यावी यासाठी वारंवार शासनाकडे निवेदने सादर केली होती. अशा प्रकारे लॉगिंग सूत्र पध्दती प्रमाणे कूप तोडीची कामे करण्यासाठी जंगल कामगार सहकारी संस्थाकडून मुळीच प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून सहकारी संस्थांची बाजू विचारात घेऊन कूप तोडीची कामे देण्याच्या पध्दती निश्चित होईपर्यंत मध्यंतरीच्या काळात

प्रत्येक वर्षी आदेश निर्गमित करुन कूपतोडीची कामे "अ व "ब" ऑडिट वर्ग मिळालेल्या जंगल कामगार सहकारी संस्थांना सुधारित सूत्र पध्दतीने आणि "क" व "ड" ऑडिट वर्ग मिळालेल्या जंगल कामगार सहकारी संस्थांना लॉगिंग सूत्र पध्दतीने कूप तोडीची कामे देण्यात येत होती. दरवर्षी आदेश काढून कूपतोडीची कामे देण्याच्या पध्दती ठरविण्यापेक्षा त्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन जंगल कामगार सहकारी संस्थांना कूप तोडीची कामे देण्याच्या पध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता जंगल कामगार सहकारी संस्थांना कूप तोडीची कामे देण्याबाबत [१] सुधारित सूत्र पध्दती व [२] लॉगिंग सूत्र पध्दती अशा दोन्ही पध्दती चालू ठेवण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे:-

१] "अ" व "ब" ऑडिट वर्ग मिळालेल्या संस्थांना सध्या प्रचलित असलेल्या सुधारित सूत्र पध्दतीप्रमाणे कूप तोडीची कामे देण्यात यावीत.

२] "क" व "ड" ऑडिट वर्ग मिळालेल्या जंगल कामगार सहकारी संस्थांना कूप तोडीची कामे प्रचलित लॉगिंग सूत्र पध्दतीच्या स्थाई आदेशानुसार खालील सुधारणा विचारात घेऊन देण्यात यावीत.

अ] जंगल कामगार सहकारी संस्थांच्या सभासदांनी कूपात केलेल्या कामाच्या श्रमदिनाच्या मजूरीची जी रक्कम असेल त्या रकमेच्या ३५% एवढी रक्कम संस्थेस अनुदान म्हणून देण्यात यावी.

ब] ज्या संस्थेने कूपाचे काम कार्यक्षमपणे केलेल्या संस्थेला प्रोत्साहनात्मक अनुदान म्हणून सभासदांनी केलेल्या कामाच्या श्रमदिनाची जी मजूरी असेल त्या रकमेच्या १०% एवढी जादा रक्कम सभासदांच्या कल्याणकारी कामासाठी देण्यात यावी. त्यास संस्थेने खालील अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

[एक] कूपाच्या कामाबद्दल दिलेल्या वेळापत्रकाचे पालन करुन कूपाची कामे वेळेवर केली पाहीजेत.

[दोन] कूप कामाबाबत ज्या नोंदवह्या ठेवावयाच्या आहेत त्या वेळेवर व योग्यपणे असलेल्या पाहिजेत.

[तीन] कूपतोडीची कामे काटकसरीने केलेली असावीत व प्रकाष्ठ निष्कासनाचे काम शास्त्रशुध्द पध्दतीने केलेले असावे व विक्री योग्य माल कूपात राहता कामा नये

[चार] सहकारी संस्थेच्या सभासदांसाठी करावयाची कल्याणकारी कामे संस्थेच्या मंजूरासाठीच केलेली असावीत.

[क] संस्थेला देण्यात आलेल्या कूपाबाबत करारपत्र न करता संस्थेला फक्त कूपाबाबत वर्क ऑर्डर देण्यात यावी

Logging

ड] सहकारी संस्थेने कूपात केलेल्या कामातून निघालेले वनोपज एकत्र जमा करून शासनाच्या आगारामध्ये रचून ठेवावे. अशा वनोपजाची विक्री शासकीय आगारातच संबंधित उप वनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी यांच्यामार्फतच करावी.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र.क्र. ८ १८/९३/व्यय १० दिनांक १७ नोव्हेंबर १९९३ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

गो.डे.तायडे

[गो. डे. तायडे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, ६- अे नंवाब ले आउट टिळक नगर नागपूर ४४० ०१०,
मुख्य वनसंरक्षक [उत्पादन], महाराष्ट्र राज्य, नागपूर.
मुख्य वनसंरक्षक [संधारण], महाराष्ट्र राज्य, नागपूर,
सर्व वनसंरक्षक,
सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ,
सर्व विभागीय वन अधिकारी,
सर्व विभागीय व उप विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ,
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे
विशेष वन अधिकारी, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
कृषि व सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर
खाजगी सचिव मंत्री [वने]
खाजगी सचिव राज्यमंत्री [वने]
खाजगी सचिव मंत्री [आदिवासी विकास विभाग]
खाजगी सचिव मंत्री [सहकार]
सर्व कार्यासन अधिकारी, वन विभाग, मंत्रालय मुंबई
निवड नस्ती फ-९ कार्यासन, महसूल व वन विभाग.